# इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

(1996) 3 एस.सी.आर. 695

कल्याण संघटना, सेक्टर 7,

अर्बन इस्टेट, फरीदाबाद

विरुध्द

राजीव कपूर आणि इतर

20 मार्च ,1996

[ न्यायमूर्ति के. रामस्वामी, न्यायमूर्ति एस. पी. भरुचा आणि न्यायमूर्ति के. एस. परीपूरनन]

पर्यावरण कायदा - नगर विकास प्राधिकरण - योजना - हरित पट्टा क्षेत्राचे - उत्तरवादींकडून पेट्रोल पंपात रूपांतर करणे - कल्याण संघटनेची उत्तरवादीनं विरुद्ध मनाई हुकुमाची मागणी - न्यायचौकशी कोर्टाने दिलेला अंतरिमकालीन मनाई हुकूम - त्यानंतर हुकूम रद्दबादल करणे - अपीलीय न्यायालयाने देखील अंतरिमकालीन मनाई हुकूम जारी करणे - उच्च न्यायालयाने अपीलीय कोर्टाचा आदेश रद्द करणे आणि न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाची पुष्टी करणे - अपील - मानले , उच्च न्यायालयाचे अपीलीय न्यायालयाने जारी केलेल्या आदेशात हस्तक्षेप करणे पूर्णपणे असमर्थनीय नव्हते - प्रलंबित दाव्याचा विचार करता उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणे आवश्यक नाही असे मानले - दावा त्वरित निकाली काढण्याचे न्यायचौकशी न्यायाधीशाला निर्देश - दाव्याचा निकाल प्रलंबित - दाव्यातील निर्णयाच्या अधीन उत्तरवादींचे पेट्रोल पंप चालवणे सुरू ठेवणे .

दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. 5269 / 1996

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिनांक 10/05/1995 रोजी सी . आर. पी. क्रमांक 1191/1995 मध्ये पारीत केलेल्या निकाल आणि न्यायनिर्णयावरून.

अपीलकर्त्यासाठी :- गोपाल सुब्रमण्यम, ए. रावल, राजेश के. शर्मा आणि गुडविल इंडीवर.

उत्तरवादीसाठी :- दुष्यंत दवे, विवेक सिब्बल, एस. एम. सरीन, पी. एन. पुरी.

उत्तरवादी क्रमांक 2 साठी :- आर .के . जैन

न्यायालयाने खालील आदेश पारित केला :

अनुमती मंजूर . आम्ही दोन्ही पक्षांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.

विशेष परवानगीद्वारे हे अपील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशाच्या दिवाणी पुनरीक्षण याचिका क्रमांक 1191/1995, मध्ये पारित केलेल्या आदेशावरून उद्भवते. फरिदाबाद नगर विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या योजनांमध्ये चिन्हांकित केलेल्या सेक्टर 7 मधील हरित पट्टा संवर्धनासाठी अपीलकर्ता संघटना मागणी करत आहे. अपीलकर्त्याने हरित पट्टा ,उत्तरवादी क्रमांक ०१ तर्फे चाललेल्या जाणाऱ्या पेट्रोल पंपात रूपांतर करण्यापासून उत्तर वादींना प्रतिबंधित करणाऱ्या कायमस्वरुपी मनाई आदेशासाठी दिवाणी खटला दाखल केला होता. खटला प्रलंबित असलेल्या न्यायचौकशी न्यायालयाने सुरुवातीला जरी अंतरिमकालीन मनाई हुकूम मंजूर केला असला तरी न्यायालयाने तो रद्द केला. जिल्हा न्यायाधीशांनी असे म्हटले की उत्तरवादींच्या विरोधात मनाई आदेश देण्यासाठी प्रथमदर्शनी खटला दाखल करण्यात आला होता. त्यानुसार अंतरिम मनाई हुकूम देण्यात आला. उच्च न्यायालयाने, पुनरीक्षणा नंतर अपिलीय न्यायालयाचा आदेश रद्द केला आहे आणि न्यायचौकशी न्यायालयाचा आदेश मान्य केला आहे. त्यामुळे विशेष अनुमतीद्वारे हे अपील.

बरयाच काळानंतर, अभिलेखातील कागदपत्र लक्षात घेता, अपीलीय न्यायालयाच्या आदेशात उच्च न्यायायालयाचा हस्तक्षेप पूर्णपणे असमर्थनीय आहे असे आम्ही म्हणू शकत नाही. मात्र, खटला प्रलंबित असल्याने आम्ही खटल्याच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्यास नकार देतो. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास आम्ही इच्छुक नाही. तथापि, न्यायालयांनी नोंदवलेली खालील निरीक्षणे आणि निष्कर्ष कोणत्याही प्रकारे खटल्याच्या अंतिम निकालावर परिणाम करू नयेत. या खटल्याच्या तथ्य आणि परिस्थितीनुसार, आम्हाला वाटते की न्यायचौकशी न्यायाधीशांनी हा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून चार महिन्यांच्या कालावधीत

खटला शक्य तितक्या लवकर निकाली काढावा. खटल्याची सुनावणी प्रलंबित असताना, पहिल्या उत्तरवादीला, पर्यावरणाला कोणतीही हानी न पोहोचवता, आज अस्तित्वात असलेला  पेट्रोल पंप चालवण्यासाचे स्वातंत्र्य आहे. पहिल्या उत्तरवादीने केलेली कोणतीही कारवाई दाव्यातील परिणामाच्या अधीन असेल. हे नमूद करण्याची गरज नाही की खटला निकाली काढताना पहिल्या उत्तरवादीला कोणत्याही सामान हक्कासाठी खटला चालविण्याचा अधिकार नाही.

त्यानुसार अपील फेटाळली जाते. खर्चा बाबत कुठलाही आदेश नाही .

अपील  निकाली काढण्यात आली .

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.